# प्रकरण चार

# पशुसंवर्धन विभाग

## 4.349 75 टक्के अनुदानाने संकरीत गायी खरेदी करणे व वाटपाबाबत.

**पंचायत समिती भिवंडी, जिल्हा ठाणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** पंचायत समिती भिवंडी (पशुसंवर्धन विभाग) यांनी सन 2015-2016 या वित्तीय वर्षात 75 टक्के अनुदानाने संकरीत गायी खरेदी करणे कामी रक्कम रुपये 9,30,000/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 107 व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 125 नुसार प्रथम प्रशासकीय मंजुरी घ्यावी व नंतर तांत्रिक मंजुरी घ्यावी असे आदेश असताना तांत्रिक मंजुरी अगोदर घेतलेली आहे.

2) ठराव समिती शिफारस पत्रावर जावक क्रमांक व दिनांक नमूद नाही.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मागास1098/प्र.क्र.73/34,दिनांक 20/10/1999 मधील अनुक्रमांक 4 नुसार लाभार्थ्यांच्या निवडीमध्ये अनियमितता होऊ नये, म्हणून त्या लाभार्थ्यांची नोंदवही तयार करून लाभार्थीनिहाय लाभ दिल्याच्या यादया तयार कराव्यात व त्यामध्ये दिलेल्या लाभांची नोंद करावी अशा सूचना आहेत, असे आदेश असतांना लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे दुबार लाभाची शक्यता नाकारता येत नाही.

4) श्रीमती जयवंती देवराम पितांबरे यांच्या जनावराच्या स्वास्थ्य दाखल्यावर गायीचे वय, रंग, टॅग क्रमांक नमूद नाही. तसेच ताबा पावतीवर दिनांक नमूद नाही. तसेच गाय खरेदीचा करारनामा केलेला नाही.

5) 24 लाभार्थी गायी खरेदी दिनांक 23/03/2016 ला केल्या व विमा दिनांक 20/04/2016 ला उतरविला आहे. तसेच 7 लाभार्थी गायी खरेदी दिनांक 30/03/2016 ला केल्या व विमा दिनांक 09/05/2016 ला उतरविला आहे. विमा विलंबाने उतरण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

6) लाभार्थ्यांचे गायी सोबतचे फोटो नस्तीसोबत जोडलेले नाहीत.

7) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडएपी/2008/प्र.क्र.446/वित्त 09, दिनांक 20/06/2008 मधील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार सदर योजनेची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर नियमाचे उल्लंघन झाले आहे.

## 4.350 50 टक्के अनुदानावर दुधाळ म्हैस गट वाटप योजनेतील अनियमिततेबाबत.

**पंचायत समिती मोखाडा, जिल्हा पालघर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती मोखाडा सन 2015-16 या वित्तीय वर्षात पशुसंवर्धन विभागाने जिल्हा परिषद स्तरावरून प्राप्त झालेल्या अनुदानातून 50 टक्के अनुदानावर 6 लाभार्थींना म्हैस गट वाटप केले आहे. त्यातील अनियमितता खालीलप्रमाणे आहेत.

1) कल्याण येथील बाजारातून दुधाळ म्हैस खरेदी केल्यानंतर बाजारातच लाळया खुरकत लसिकरण करणे आवश्यक असताना तसे केल्याचे दिसत नाही. लसीकरण केले बाबत प्रमाणपत्र उपलब्ध नाही.

2) सदर योजनेच्या अटीनुसार लाभार्थींनी किमान 3 वर्षे दुग्ध व्यवसाय करणे आवश्यक आहे. पण, सदर लाभार्थी सद्दस्थितीत दुग्ध व्यवसाय करत असलेबाबत अहवाल लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झाला नाही.

3) सदर योजनेतून प्राप्त झालेल्या दुधाळ म्हशी पशुधन विकास अधिकारी, पंचायत समिती, मोखाडा यांचा दाखला दिनांक 10/03/2016 नुसार दुधाळ म्हशीची नोंद आहे व सदर म्हैस व्यालेली आहे. पण, दाखल्या सोबत वासराची नोंद नसल्यामुळे सदर म्हैस दुधाळ आहे की भाकड आहे याची खात्री लेखापरीक्षणात देता आली नाही.

**4.351 जिल्हा परिषद योजना अंतर्गत 50 टक्के अनुदानावर म्हैस गटवाटप करण्याची योजना.**

**पंचायत समिती जव्हार, जिल्हा पालघर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदर बाबत रक्कम रुपये 2,80,000/- खर्च झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त योजनेच्या प्रशासकीय मंजुरी आदेशाची प्रत पहावयास मिळाली नाही.

2) कृषि उत्पन्न बाजार समिती कडील म्हैस गट खरेदी पावत्यांची पडताळणी केली असता, पावतीत जनावरांची संख्या 2 नमूद केली आहे. परंतु म्हैसीसोबत कारड / पारडू आल्याची नोंद नाही. त्यामुळे दुधाळ म्हैस खरेदी केल्याची खात्री होत नाही.

3) बाजारातून खरेदी केल्यानंतर बाजारातील स्थानिक पशुवैद्यकीय अधिकारी यांचेकडून लाळ्या खुरपत रोगाचे लसीकरण करून घेतल्याचे दाखले प्रमाणकासोबत जोडलेले नाही.

4) उपरोक्त म्हशींचा विमा दिनांक 15/02/2016 रोजीचा आहे. म्हैस गट खरेदी दिनांक 23/01/2016 रोजी केली आहे. जनावरांचा पुरवठा केंद्रापासून ते प्रत्यक्ष लाभार्थींचे गावापर्यंत वाहतुकीचा, जनावरांचा वाहतूक विमा काढणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही झाली असल्याचे विमा कंपनीकडील पावत्या अभावी प्रमाणित करता आले नाही.

5) जनावरांसोबत (म्हैशीचे रेडकुसह) लाभार्थींचे फोटो काढून प्रमाणकासोबत जोडलेला नाही. त्यामुळे दुधाळ म्हैस खरेदी केल्याची खात्री होत नाही.

6) सदर योजनेच्या मार्गदर्शक सुचना नुसार शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2011/प्र.क्र.414/पदम-4, दिनांक 06/09/2011 नुसार 3 टक्के विकलांग लाभार्थींना लाभ द्यावयाचा आहे. तथापि, अशी कार्यवाही झाली असल्याचे दिसून येत नाही.

7) सदर योजने अंतर्गत वाटप केलेल्या म्हैस गटाची पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी त्यांच्या तालुक्यात वाटप केलेल्या ऐकून म्हैस गटाच्या 25 टक्के गटाची प्रत्यक्ष पडताळणी करावी. तसेच जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद यांनी जिल्ह्यात फिरतीचे वेळी 10 टक्के शेळीगटाची अचानक पडताळणी करावयाची आहे. तथापि, अशी कार्यावाही झाली असल्याचे दिसून येत नाही.

8) उपरोक्त प्रशासकीय मंजुरीचे आदेशातील योजनेच्या मार्गदर्शक सुचना क्रमांक 16 नुसार सदर योजना राबवितांना प्रथमत: एका दुधाळ जनावराचे वाटप करावयाचे आहे व सहा महिन्यानंतर अथवा (या मधील जो कालावधी कमी असेल तद्नंतर) वाटप केलेले दुधाळ जनावर आटल्यानंतर दुसरे जनावर वाटप करावयाचे आहे. तथापि, खरेदीची कार्यवाही एकाचवेळी केली असल्याचे दिसून येते.

**4.352 50 टक्के अनुदानावर म्हैस गट वाटप करणे.**

**पंचायत समिती पालघर, जिल्हा पालघर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** पंचायत समिती पालाघर यांनी सन 2015-2016 या आर्थिक वर्षात जिल्हा परिषद निधीमधुन 50 टक्के अनुदानावर म्हैस गट वाटप या वैयक्तिक लाभाच्या योजनेतून एकूण 19 लाभार्थींना रक्कम रुपये 7,60,000/- च्या म्हैस गटाचे वाटप केले आहे. त्याची नस्ती तपासली असता (उपलब्ध कागद पत्रानुसार) त्यामध्ये पुढीलप्रमाणे उणिवा आढळून आल्या.

1) सदर योजना कशा प्रकारे राबवावी त्याबाबत जिल्हा परिषद पालघरने तयार केलेले प्रारूप / मार्गदर्शक सुचना लेखापरीक्षणास प्राप्त झालेल्या नाहीत.

2) वैयक्तिक लाभाच्या योजनासाठी शासन निर्णया प्रमाणे माहे एप्रिल ते जून या कालावधीत प्रशासकिय मंजुरी व तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक आहे. परंतु अशी प्रशासकिय व तांत्रिक मंजुरी लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही.

3) वरील योजनेची अंमलबजावणीसाठी व्यापक प्रसिद्धी देऊन लाभार्थ्यांकडून जून व जुलै पर्यंत अर्ज प्राप्त करण्याचे शासनाचे आदेश आहे व प्राप्त अर्जाची तारीख निहाय नोंद स्वतंत्र नोंदवहीत ठेवण्यात यावी, असे असताना प्राप्त अर्जाची नोंदवही लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही.

4) लाभार्थी यादी मंजूर झाल्यानंतर एक महिन्यामध्ये लाभार्थी हिस्सा वसूल केला पाहिजे.परंतू, प्रत्यक्षात लाभार्थी यादी दिनांक 14/10/2015 ला प्रसिध्द होऊनही लाभार्थी हिस्सा दिनांक 14/01/2016 व दिनांक 19/01/2016 ला चलनाने भरणा केला आहे.

5) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग क्रमांक शासन निर्णय प्र.क्र.323/पदुम-4, दिनांक 11/11/2011 यांचे मार्गदर्शक सूचनांनुसार एकूण लाभार्थ्यांपैकी 30 टक्के महिला व 3 टक्के अंपगाना लाभ देण्यात यावा असे असताना त्याप्रमाणे लाभ दिलेला नाही.

6) वैयक्तिक लाभाचे योजनेतील प्रत्यक्ष लाभ नोव्हेंबर/डिसेंबर पर्यंत देण्यात यावा, अशा शासनाच्या सूचना असताना म्हैस गट प्रत्यक्षात फेब्रुवारीमध्ये खरेदी केलेले आहेत.

7) सदर म्हैस गटांचा विमा उतरविण्याची कागदपत्रे लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाहीत.

**4.353 पशुवैदयकीय दवाखाना जांभुळपाडा येथील औषध साठा नोंदवही बाबत.**

**पंचायत समिती सुधागड-पाली, जिल्हा रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 22) -** पंचायत समिती सुधागड-पाली सन 2015-2016 चे लेखापरिक्षणाच्यावेळी पशुवैदयकिय दवाखाना जांभुळपाडा येथील सन 2015-2016 चे औषध साठा नोंदवही तपासली असता औषध साठा नोंदवहीत सन 2015-2016 प्राप्त औषधांपैकी बहुतांश औषधे वर्ष अखेरपर्यंत विनावाटप शिल्लक असल्याचे दिसून येते. काही औषधे प्राप्त दिनांकापासून ते तपासणी वित्तीय वर्ष अखेरपर्यंत वाटपच झाल्याचे दिसून येत नाही. औषधाची आवश्यकतेप्रमाणे मागणी करणे आवश्यक असताना तसे केल्याची दिसून येत नाही. तसेच ज्या औषधांचे मुदत संपत आलेली आहेत (Near Expiry) अशा औषधे यांची यादी करुन तालुका स्तरावर कळविणे आवश्यक असताना तसे केल्याचे दिसुन येत नाही. तसेच सदर साठा नोंदवहीत मुदतबाहय दिनांक नमुद केलेली नाही. स्वतंत्र मुदतबाहय (Near Expiry) नोंदवही ठेवणे आवश्यक असताना ते ठेवलेली नाही.

**4.354 कामधेनू दत्तकग्राम योजना खर्चाबाबत.**

**पंचायत समिती चांदवड, जिल्हा नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 60) -** सदरबाबत रक्कम रुपये 4,17,142/- खर्च नोंदविला आहे. पंचायत समिती चांदवड सन 2015-2016 च्या लेखापरीक्षणात पशुसंवर्धन विभागाकडील कामधेनू दत्तकग्राम योजनेची नस्ती संबंधित शासन निर्णय क्रमांक नापुयो/2010/ प्र.क्र.50/ पदुम-4, दिनांक 29/10/2010 मधील तरतुदींच्या/अटी शर्तीच्या अनुषंगाने, तपासली असता त्यावर खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) आयुक्त पशुसंर्वधन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जावक क्रमांक एफवायपी 11(11)सीआर -752(भाग-3) 2011 पं.स.6, दिनांक 13/04/2012 अन्वये कामधेनु दत्तक ग्रामयोजना राबविण्यासाठी मंजुरी देवून मार्गदर्शक सुचना दिल्या आहेत. सदरची योजना शासन निर्णय क्रमांक नापुयो-2010/प्र.क्र.50/पदुम-4, मुंबई दिनांक 29/10/2010 अन्वये अंमलबजावणी करण्याबाबत सुचित केले आहे. त्यानुसार कार्यवाही करणेत आलेली नाही.

2) मार्गदर्शक सुचना मधील आराखडा तयार करतांना, अनुक्रमांक 2 नुसार दत्तक ग्राम योजने अंतर्गत निवड केलेल्या गावामध्ये ज्या पशुपालकाकडे जास्त पधुधन घटक संख्या आहे. अशा सभासदांची निवड करुन निवड केलेल्या सभासंदांची बैठक घेवुन त्यापैकी 9 सभासदांचे पदाधिकारी मंडळ स्थापन करुन स्थापन केलेल्या मंडळास स्थानिक नाव देवुन त्यांची नोंदणी धर्मादाय आयुक्त यांचे कडून करण्याबाबत सुचित केले आहे. तथापि सुचनेनुसार मंडळ सभासदामधुन निवड केल्याचे अभिलेखे नस्तीसोबत नाहीत. धर्मादाय आयुक्ताकडे आत्मा संघटनेमार्फत पशुपालक मंडळाची नोंदणी कामी खर्च नोंदविलेला आहे. तथापि धर्मादाय आयुक्तांकडील नोंदणीचे कागदपत्र नस्तीबध्द केलेली नाहीत.

3) आयुक्त, पशुसंर्वधन महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दिनांक 13/04/2012 च्या मार्गदर्शक सुचनेच्या अनुक्रमांक 2 नुसार पशुपालक मंडळ स्थापन करुन सहलीचे आयोजन करणेबाबत सुचित केले आहे. पशुपालकांसाठी सहलीचे आयोजन करतांना मंडळातील पशुपालकांना प्राधान्य देवून ठिकाण निश्चित करण्यासाठी दुग्धव्यवसाय,

कुक्कुटपालन, शेळी पालन इत्यादी पशुसंवर्धन विभागाशी संबंधित असलेल्या सर्वोत्कृष्ट अशा संस्था/ व्यवसाय असलेले ठिकाणांना प्राधान्य देणेबाबत सुचित केले आहे. तथापि, मार्गदर्शक सुचनेनुसार ठिकाण निवड केल्याचे अभिलेखे दप्तरी नाहीत

4) सदर योजने अंतर्गत पशुपालक मंडळासाठी सहलीचे आयोजन केलेले आहे. बस खर्चाकरीता परिवहन महामंडळाकडून भाडयाचे दर किलोमीटर निम आराम, साधीबस याबाबत कोणत्याही प्रकारची माहिती न घेता परिवहन महामंडळास मागणी प्रमाणे रक्कम प्रदान केलेचे दिसून आले आहे.

**4.355 रजा प्रवास सवलत बिले प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती कर्जत, जिल्हा अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 39) -** सदरबाबत रक्कम रुपये 3,57,390/- खर्च नोंदविण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रदानांच्या नोंदी तपासणी कामी सेवापुस्तकांच्या पडताळणीत रजा प्रवास सवलतीच्या नोंदी सेवापूस्तकात आढळून आलेल्या नाहीत**.**

2) ज्या ठिकाणी प्रवास केलेला आहे व निवास केला आहे त्या ठिकाणचे प्रवासाचे तिकिटे व निवासस्थानात वास्तव्य केल्याची बिले पुराव्यादाखल नस्ती सोबत आढळून आलेली नाहीत**.**

3) कुंटुंब या व्याख्येमध्ये स्वत: कर्मचारी**,** पत्नी व त्याची 18 वर्षा आतील दोन मुले रजा प्रवास सवलतीस पात्र असतांना इतर कुंटुंब सदस्यांसोबत प्रवास केल्याचे दर्शवून बिलांचे नियमबाहय प्रदान झालेले आहेत.

वरील प्रमाणे वरील नमूद बाबींनुसार झालेला खर्च लेखापरीक्षणात अमान्य करण्यात येत असून वरील संबधीतांकडून वसुल करुन अनुपालन दर्शवावे.

**4.356 विशेष घटक योजनेअंतर्गत लाभार्थींना दुभत्या गायीसाठी अनुदान वाटप करणे बाबत.**

**पंचायत समिती कोपरगांव, जिल्हा अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 30) -** पंचायत समिती कोपरगांव सन 2015-2016 या वर्षात लाभार्थींना गाय खरेदीसाठी रक्कम रुपये 2,55,184/- अनुदान वाटप करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासन, कृषी,पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवयो -2011/ प्र.क्र. 305/ पदुम-4, दिनांक 22/11/2011 अन्वये योजनेच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सुचनाचे पालन केले नाही त्यातील अनियमितता खालील प्रमाणे आहेत.

1) अंमलबजावणी अधिका-याने या योजनेस सर्वप्रकारच्या प्रसिध्दी माध्यमाव्दारे व्यापक प्रसिध्दी देवून लाभार्थीकडून अर्ज मागविण्यात आलेले नाहीत.

2) तालुकास्तरीय अधिका-यांनी (पविअ-विस्तार)अर्ज स्विकारून प्राप्त झालेले सर्व अर्ज जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद/जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालयातील सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन यांचेकडे जिल्हास्तरीय लाभार्थी निवड समितीच्या मान्यतेसाठी सादर करावेत. प्राप्त झालेल्या सर्व अर्जाची तारीखनिहाय नोंद स्वतंत्र नोंदवहीत ठेवण्यात यावी याप्रमाणे सुचनाचे पालन करण्यात आलेले नाहीत.

3) ही योजना शक्यतो क्लस्टर स्वरूपात आणि अस्तित्वातील/प्रस्तावित दूध संकलन मार्गावरील गावामध्ये राबविण्यात यावी. या बाबतचे कोणतेही कागदपत्र नस्तीत आढळून आले नाहीत.

4) योजने अंतर्गत खरेदी केलेल्या दुधाळ जनावरांची महाराष्ट्र अँनिमल आयडेंटीफिकेशन अँड रेकॉर्डीग यांचेकडे नोंदणी करणे बंधनकारक आहे. तथापि, नमूद केल्याप्रमाणे कोणतेही दस्तऐवज नस्तीत आढळून आले नाहीत. दस्तऐवज उपलब्ध करुन दर्शवावेत.

5) पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी वाटप केलेल्या दुधाळ जनावरांच्या 25 टक्के जनावरांची प्रत्यक्ष पडताळणी करावी तसेच जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद व जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त 10 टक्के जनावंराची प्रत्यक्ष पडताळणी करावी, व तसा अहवाल वरिष्ठांस सादर करावा तसा अहवाल नस्तीत तपासणीत उपलब्ध झाला.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक मागास 1094/ सी.आर.2239/ 34/67, दिनांक 01/09/1993 मधील परिच्छेद क्रमांक 4 नुसार वैयक्तीक लाभाच्या योजना राबविल्यानंतर लाभ दिलेल्या लाभार्थीच्या आर्थिक स्थितीत काय सुधारणा झाली? याचा अहवाल योजनेच्या नस्तीत आढळून आला नाही. त्याबाबत योग्य ती पुर्तता करावी.

**4.357 कामधेनू दत्तक ग्राम योजनेच्या खर्चातील अनियमितता. (शासकीय)**

**पंचायत समिती मालेगांव, जिल्हा वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,96,350/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2015-2016 मध्ये कामधेनु दत्तक ग्राम योजना राबविण्यासाठी पत्र क्रमांक जिपवा/पशु/कादग्रायो/ कावी/221/2016, दिनांक 20/02/2016 अन्वये रुपये 2,15,000/- अनुदान प्राप्त झाले आहे. सदर अनुदाना मधुन केवळ रुपये 68,636/- खर्च करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर योजना परिपुर्ण राबविली नसल्याचे दिसते व योजनेची फलश्रुती झाली नाही.

2) सन 2014-2015 या वित्तीय वर्षात राबविणेत आलेल्या योजनेची बिले सन 2015-2016 मधील प्राप्त अनुदानामधुन खर्ची घातली असल्याने रक्कम रुपये 22,585/- अंतिम अमान्य करणेत येत असुन शासन खाती सदरील रक्कम भरणा करणे आवश्यक आहे.

3) कामधेनु दत्तक ग्राम योजनेच्या सर्व प्रमाणकाची तपासणी केली असता, एकाच दिवशी एकाच वाहनाव्दारे दोन ठिकाणच्या सहली आयोजित केल्या असल्याचे दिसते. त्यामुळे वाहन क्रमांक MH-37,G7257 रक्कम रुपये 4,950/- व वाहन क्रमांक MH-14 BX-7382 रक्कम रुपये 4,950/- वसुलात आणणे आवश्यक आहे.

4) प्रमाणक क्रमांक 944 मध्ये दिनांक 22/03/2016 रोजी व्दारका ट्रॅव्हल्सकडुन MH-37,G-1654 या वाहनाव्दारे सहल आयोजित करुन रुपये 4,990/- खर्च करण्यात आला आहे. परंतु गावाचे नाव नमुद नाही. तरी त्याबाबत खुलासा करावा.

5) महाराष्ट्र शासन, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक नापुयो 2010/प्र.क्र.50/पदुम-4, दिनांक 29/10/2010 नुसार दत्तक ग्रामाची निवड करण्यासाठी निकष दिलेले आहे. सदर निकषानुसार दत्तक गावाची निवड करण्यापुर्वी त्या गावातील गाई / म्हशीची किमान संख्या 300 असावी तसेच त्या गावामध्ये दुधाळ जनावरांची संख्या सर्वात जास्त असणे आवश्यक आहे. हे सर्वेक्षण संबंधीत गावातील / नजिकच्या पशुवैदयकीय दवाखान्यातील पशुसंवर्धन कर्मचाऱ्याने करणे आवश्यक आहे. दत्तक ग्रामाची निवड करावयाची असल्यामुळे जितक्या ग्रामाची निवड करावयाची आहे. त्यापेक्षा कितीतरी जास्त गावातील दुधाळ जनावरांची / पैदास सक्षम गाई / म्हशीची माहिति संकलीत करुन त्यानुसार तुलनात्मक तक्ता करुन तुलनेत ज्या गावातील सक्षम गाई / म्हशीची, दुधाळ जनावरांची संख्या जास्त आहे अशा गावाची दत्तक ग्राम म्हणुन निवड करावयाची आहे. परंतु इतर गावातील संकलित माहिती आणि तुलनात्मक तक्ता लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्यामुळे दत्तक ग्रामाची निवड निकषानुसार झाल्याची खात्री पटत नाही.

6) मार्गदर्शन सुचनातील अनुक्रमांक 08 मध्ये नमुद केल्याप्रमाणे योजनेअंतर्गत सर्व बाबींची एकत्रित यशोगाथा तयार करून फलश्रुती अहवाल तयार करावा असे नमुद आहे. परंतु फलश्रुती अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध केला नाही. त्यामुळे योजना राबविण्याचा उद्देश सफल झाला किंवा कसे पडताळणी करता आली नाही.

7) योजना सुरु केल्यापासुन सर्व कार्यक्रम नियोजनबध्द पध्दतीने राबविल्यानंतर सर्व दुधाळ जनावरांचे दुध उत्पादनाबाबत पुन्हा सर्वेक्षण करण्यात यावे व त्याच्या स्वयंस्पष्ट नोंदी करुन सदर दत्तक गावांमध्ये दुध उत्पादनामध्ये किती वाढ झाली याची नोंद घेणे आवश्यक आहे परंतु या प्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

8) कामधेनु दत्तक ग्राम योजनेअंतर्गत बाबनिहाय खर्चाबाबत मार्गदर्शक सुचना क्रमांक 2 नुसार दत्तक ग्राम योजनेअंतर्गत निवड झालेल्या गावामध्ये ज्या पशुपालकांकडे जास्त पशुधन घटक संख्या आहे अशा 51 सभासदांची निवड करावी. अशा निवडलेल्या सभासदांची बैठक घेवुन त्यापैकी 11 सभासदांचे पशुपालक मंडळ स्थापन

करावे. अशा स्थापन केलेल्या मंडळास स्थानिक नाव देवुन, त्यांची नोंदणी धर्मादाय आयुक्त यांचेकडे करणे आवश्यक आहे. परंतु अशाप्रकारची कार्यवाही केल्याचे दिसत नाही.

**4.358 विशेष घटक योजना व ओटीएसपी योजना अंतर्गत 75 टक्के अनुदानावर दुधाळ जनावरांचे गट वाटप करणेबाबत.**

**पंचायत समिती मंगरुळपीर, जिल्हा वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 48) -** सदरबाबत रक्कम रुपये 6,00,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो 2011/प्र.क्र.305/पदुम-4, दिनांक 22/11/2011 नुसार शासनाने पशुसंवर्धन अधिकाऱ्याने या योजनेस सर्वप्रकारच्या प्रसिध्दी माध्यमाव्दारे व्यापक प्रसिध्दी देवून लाभार्थ्याकडून अर्ज मागविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे अभिलेख नस्तीमध्ये आढळुन आलेला नाही. तसेच पंचायत समितीस किती अर्ज प्राप्त झाले व त्यापैकी किती पात्र लाभार्थी अर्ज जिल्हा स्तरावरील समितीकडे पाठविण्यात आले, तसेच जिल्हा निवड समितीने पात्र अपात्र ठरविलेल्या लाभार्थ्यांची यादी याबाबतचा कुठलाही अभिलेख नस्तीमध्ये नाही.

2) योजनेतील मार्गदर्शक सूचना क्रमांक 4 नुसार शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2011/प्र.क्र.414/पदुम-4, दिनांक 06/09/2011 नुसार 3 टक्के विकलांग लाभार्थ्यांना या योजने अंतर्गत लाभ देण्यात यावा. अशी सूचना असतांना विकलांग लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला नाही.

3) शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचना क्रमांक 7 नुसार जिल्हास्तरावर लाभार्थी निवड समितीने निवड केलेल्या लाभार्थ्यांची यादी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद यांच्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात यावी व तसे लाभार्थ्यांना कळविणे आवश्यक असतांना जिल्हास्तरावरुन तशी कार्यवाही झाल्याबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

4) या योजनेमध्ये मार्गदर्शक सूचना क्रमांक 11 मध्ये नमुद केलेल्या जातीच्या गाई किंवा म्हैशी 10 ते 12 व 8 ते 10 लिटर प्रतीदिन दुध देणाऱ्या गायी किंवा म्हैशी दुसऱ्या / तिसऱ्या वेतातील 15 ते 30 दिवसांपुर्वी व्यालेल्या संकरीत गायी / म्हैशीचे वाटप करणे आवश्यक असतांना तशा प्रकारची कार्यवाही केली नाही.

5) लाभार्थ्याचा खरेदी केलेल्या जनावरा सोबतचा फोटो हा बाजार समितीत तसेच खरेदी समितीच्या सदस्यांबरोबर काढलेला नाही. सर्व फोटो हे घरी काढलेले असल्याचे निदर्शनास आलेत. त्यामुळे प्रत्यक्षात बाजार समितीत खरेदी विक्री झालेली असल्याबाबत खात्री करता येत नाही.

6) लाभार्थ्यांच्या ताबा पावतीवर दिनांक व ठिकाण नमुद नाही. तसेच ग्रामपंचायत सचिव यांनी जनावर गावात आल्याचे व जनावर नोंदवहीत नोंद घेतल्याबाबतचे प्रमाणपत्र दिलेले आहे. मात्र जनावराची कुठल्या तारखेला पाहणी केली. तसेच नोंदवहीचा पान क्रमांक प्रमाणपत्रावर नमुद नाही.

7) या योजनेअंतर्गत खरेदी केलेल्या दुधाळ जनावरांची महाराष्ट्र ॲनिमल आयडेंटिफिकेशन अँड रेकॉर्डींग ॲथॉरिटी यांचेकडे नोंदणी करणे बंधनकारक असतांना त्यानुसार नोंदणी केल्याचे अभिलेखे दर्शविले नाहीत.

8) मार्गदर्शक सूचना क्रमांक 20 नुसार पशुधन विकास अधिकारी (विस्तार), व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांनी विहीत टक्केवारीनुसार पुरवठा केलेल्या दुधाळ जनावराची प्रत्यक्ष पडताळणी करुन तसा अहवाल वरिष्ठास सादर केल्याचे अहवाल तपासणीस उपलब्ध केले नाहीत.

9) मार्गदर्शक सूचना क्रमांक 27 नुसार दुधाळ जनावरांचे पालन करण्यासाठी पुरेशी जागा असल्याबाबत व मार्गदर्शक सूचना क्रमांक 28 नुसार लाभार्थ्याने दुग्ध व्यवसाय / गाय-म्हैस पालन विषयक प्रशिक्षण घेतल्याचे व सूचना क्रमांक 30 नुसार बंधपत्र करुन घेतल्याचे अभिलेखे सबंधीत नस्तीत उपलब्ध झाले नाहीत.

10) लाभार्थी अर्जावरील हमीपत्रानुसार दुधाळ जनावर मी तीन वर्ष विकणार नाही. त्यापासुन दुग्धव्यवसाय करेल जर तीन वर्षापुर्वी विकले तर पशुसंवर्धन विभागाच्या कोणत्याही योजनेचा लाभ मला मिळणार नाही. मात्र याप्रमाणे पाहणी केलेली असल्याबाबतचा अहवाल नाही. सबब योजनेची फलश्रुती बाबतचे अभिलेखे सबंधीत नस्तीत उपलब्ध झाले नाहीत. फलश्रुतीबाबत अभिलेख्यासह सत्यता पटवावी.

**4.359 75 टक्के सुटीवर आदीवासी क्षेत्राबाहेरील आदीवासी लाभार्थ्यांना 2 गट दुधाळ जनावरे पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती कळमेश्वर, जिल्हा नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदर बाबत रक्कम रुपये 1,70,124/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थी प्राधान्य क्रम - महाराष्ट्र शासन, कृषि पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो 2011/प्र.क्र.-305/पदुम 4, दिनांक 22/11/2011 शासकीय अनुदान व्यतीरिक्त 25 टक्के रक्कम स्वत: उभारणी करावी लागेल बँक / वित्तीय संस्थेकडून कर्ज घेणाऱ्या (पैकी 5 टक्के लाथार्भी हिस्सा व 20 टक्के बँकेचे कर्ज) लाभार्थ्यांस योजनेअंतर्गत प्राधान्य देण्यात यावे. उपरोक्त शासन निर्णयानुसार या योजनेची कर्ज पुरवठासाठाची तरतुद संबंधीत जिल्हाच्या Potential linked credit plan मध्ये करणेबाबत सुचनेत असे निर्देश असतांना प्राधान्य क्रमाने लाभ देण्यात आलेला नाही.

2) जनावरे नोंदणी - उपरोक्त शासन निर्णयानुसार खरेदी केलेल्या दुधाळ जनावरांची महाराष्ट्र ॲनिमल आयडींटीफीकेशन ॲन्ड रेकॉर्डींग ऑथरिटी यांचेकडे नोंदणी करणेबाबत निर्देश असतांना नोंदणी करण्यात आली नाही.

3) दुधाळ गटवाटपाबाबत - सदर योजनेअंतर्गत प्रथम एका दुधाळ जनावरांचे वाटप करण्यात यावे व सहा महिन्यांनंतर किंवा सदर वाटप केलेले जनावर भाकड झाल्यानंतर यापैकी कमी कालावधी असेल, दुसरे जनावर वाटप करणेबाबत निर्देश असतांना एकाच वेळी 2 जनावर वाटप केल्याने शासन निर्णयाचे उल्लंघन झालेले आहे.

4) 30 टक्के महिलांना व 3 टक्के अपंगाना लाभ न देणे - शासन निर्णयानुसार 30 टक्के महिलांना व 3 टक्के अपंगाना लाभ देणेबाबत निर्देश असतांना अशा लाभार्थ्यांना लाभ न दिल्याने नियमाचे उल्लंघन झाले आहे.

5) पडताळणीबाबत - सक्षम प्राधिकारी यांनी 100 टक्के पडताळणी करणे, संबंधीत पशुवैद्यकीय अधिकारी यांनी दुधाळ जनावरांबाबत स्वतंत्र नोदवहीत नोंद घेणेबाबत निर्देश असतांना, तपासणी व स्वतंत्र नोंदीवहीत नोंदी बाबत दस्ताऐवज नाही.

**4.360 विशेष घटक योजनेअंतर्गत 75 टक्के अनुदान तत्वावर दुधाळ जनावरे वाटप योजनेतील अनियमितता.**

**पंचायत समिती आर्वी, जिल्हा वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रुपये 7,01,756/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेच्या लाभांसाठी किती अर्ज प्राप्त झाले त्यापैकी छाननी नंतर पात्र व अपात्र किती. पात्र लाभार्थींचे अर्जानुसार लाभार्थींचे निवडीसाठी सभागृहासमोर लाभार्थी यादी सादर करण्यात आली नाही. तसेच ठरावामध्ये लाभांर्थीचे नाव नमुद केलेले नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क./446/वित्त-9, दिनांक 20/6/2008 नुसार वैयक्तीक लाभांच्या योजना विहीत वेळा पत्रकानुसार राबविणे आवश्यक असताना त्याप्रमाणे योजना राबविण्यात आली नाही.

3) लाभार्थी हिश्श्याची रक्कम - कृषि आयुक्तालयाचे परिपत्रक जावक क्रमांक कृषि/16सी बीसेल/लाभार्थी/470/2012, दिनांक 12/03/2012 नुसार ज्या प्रकरणी अनुदान वजा जाता लाभार्थी हिश्श्याची रक्कम वसुल करावयाची आहे तेथे ती संबंधीताकडुन रोख अथवा डी.डी. स्वरूपात वसुल करुन या रकमेची लाभार्थ्यांना शासकीय जमा पोचपावती देण्यात यावी. वसुल केलेली रक्कम अथवा डी.डी.तात्काळ संबंधीत कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कार्यालयातील रोखपालाकडे जमा करावी. रोखपालाने या रकमेची नोंदवहीमध्ये नोंद घेवुन कार्यलयाच्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या बँक खात्यात त्वरीत जमा करावी. परंतु अशा प्रकारची कार्यवाही केलेली नाही.

4) दुधाळ जनावरे राज्याबाहेरील बाजारातुन खरेदी करावयाची आहे. तसेच दुधाळ जनावरे कोणत्या बाजारातुन खरेदी करावयाचे आहे याबाबत पंचायत समितीच्या ठरावात मंजुर करणे आवश्यक आहे व त्याप्रमाणे खरेदी प्रक्रीया करणे आहे. परंतु अशा प्रकारची कार्यवाही न करता खरेदी केलेली आहे.

5) अंतरीम मार्गदर्शक सुचना दिनांक 11/04/2015 यातील बाब क्रमांक - 7 मध्ये अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांचे बँक खात्यात जमा करण्यात यावे असे स्पष्ट आदेश असताना अशा प्रकारची कार्यवाही न करताच योजना राबविलेली आहे.

6) पंचायत समितीने लाभार्थी निवडीबाबतची मास्टर नोंदवही ठेवलेली नाही.

7) लाभ घेतलेले लाभार्थी ज्या ज्या पशुवैद्यकीय दवाखाना (श्रेणी-1 व श्रेणी-2) अंतर्गत मोडत असल्यास त्या त्या पशुवैद्यकीय दवाखान्यात जनावरांची पंजी नोंदवहीत टॅग नंबरसह नोंदणी केलेल्याचे पंजी बुक मधील पान क्रमांक व नोंदणी अनुक्रमांकाचे प्रमाणपत्र संबंधीत पशुवैद्यकीय अधिकारी पशुधन पर्यवेक्षक यांचे प्रमाणपत्र लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाही.

8) लाभार्थ्याला दुधाळ जनावरे प्राप्त झाल्याबाबत लाभार्थी व जनावरे सह दिनांकीत फोटो काढणे व सदर फोटोला संबंधीत पशुवैद्यकीय अधिकारी विस्तार यांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे. परंतु अशा प्रकारची कार्यवाही केलेली नाही.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पं.स.1020/प्र.क्र.14/38, दिनांक 09/02/2011 नुसार प्रथम लाभार्थी हिस्सा वसुल करून नंतर खरेदीची प्रक्रिया करणे आवश्यक असतांना लाभार्थी हिस्सा नंतर वसूल करण्यात आला आहे.

उपरोक्त मार्गदर्शक सुचनेचे पालन केलेले नाही. तसेच प्रशासकीय बाबीकडे दुर्लक्षित झाल्यामुळे योजनेचा उद्देश सफल झाला नाही.

**4.361 बिगर आदिवासी योजने अंतर्गत 100 टक्के अनुदानावर दुभत्या जनावरांना वैरण बियाणे पुरवठा करणेबाबतची अनियमितता.**

**पंचायत समिती समुद्रपुर, जिल्हा वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 18) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,99,976/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अतिरिक्त आयुक्त, पशुसंवर्धन, आयुक्त पशुसवर्धन कार्यालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मार्गदर्शक सुचना क्रमांक वैवि/क-15(1)/1487-1559/2014, पंस-14, दिनांक 11/06/2014 अन्वये मुद्दा क्रमांक 2 नुसार सदर कार्यक्रमासाठी प्रति लाभार्थी प्रति एकर अनुदानाची मर्यादा रुपये 600/- आहे. परंतु काही लाभार्थ्यांना वैरण बियाणे वाटप करतांना एका लाभार्थ्यास रुपये 600/- पेक्षा जास्त अनुदान वाटप केल्याचे निदर्शनास येते.

मार्गदर्शक सुचनामध्ये निर्देश केल्याप्रमाणे रुपये 600/- च्या मर्यादेत अनुदान वितरीत केले असते, तर सदर लाभार्थ्यांना एकूण रुपये 47,400/- अनुदान देय ठरत होते. त्याप्रमाणे मर्यादेत अनुदान वितरीत न केल्याने लाभार्थ्यांना एकूण रुपये 10,976/- जादा अनुदान वितरीत केल्याचे निष्पन्न होते.

2) ज्वारी एम-35/1 खरेदी करण्याबाबत महाराष्ट्र स्टेट सीड्स कारपोरेशन लि., अकोला याचे शासकीय दराची प्रत नस्ती आढळून आली नाही. त्यामुळे सदर ज्वारी एम- 35/1 दराबाबत शहानिशा करता आली नाही.

3) वैरण बियाणाचे बिलावर लॉट क्रमांक नमुद केल्याप्रमाणे चाचणी अहवाल सादर करण्यात आलेला नाही.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1089/646/366/34, दिनांक 29/07/1989 अन्वये राबविलेल्या योजनेचे मुल्यमापन करणे आवश्यक असताना मुल्यमापन न केल्याने योजनेचा उद्देश सफल झाला असे म्हणता येत नाही. सक्षम अधिका-यांचे मुल्यमापन अहवाल तथा फलश्रुती अहवाल सादर करतांना पशुवैदयकीय उपकेंद्र नंदोरी, गिरड, कोरा, मंगरुळ, वायगाव (गों.) व समुद्रपूर यांच्या नस्तीत उपलब्ध झाला नाही.

**4.362 एकात्मिक कुक्कुट पालन विकास कार्यक्रमाअंतर्गत एकदिवसीय पिलांचे वाटप व खाद्य वाटप करणे.**

**पंचायत समिती भंडारा, जिल्हा भंडारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 21) -** सदर बाबत रक्कम रुपये 1,73,300/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा स्तरावरुन वित्त प्रेषणातील अटी शर्ती व आयुक्त यांच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे प्रत्येक पक्षांच्या गटाकरीता आठशे किलो खादय रुपये 12,400/- च्या मर्यादेत खरेदी करणे आवश्यक राहील, असे नमूद आहे. त्याप्रमाणे प्रत्येक किलो मागे रुपये 15 पर्यंत खर्च करणे अपेक्षित होते. परंतु, पंचायत समिती भंडाराद्वारे प्रत्येक किलो मागे रुपये 122 खर्च करण्यात आला आहे. त्यामुळे रुपये 83,200/- वसूलपात्र ठरते.

2) आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य यांच्या सन 2015-2016 च्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे पशु खाद्याचा दरकरार न करता आल्यामुळे जिल्हास्तरावर ई-निविदा मागवुन कार्यवाही करण्यात यावी, असे नमूद केले आहे. परंतु, जिल्हा स्तरावरून ई-निविदेची कार्यवाही न करता ई-निविदेची प्रक्रिया टाळण्याकरीता तुकडे करुन पंचायत समितीस्तरावर वित्त प्रेषण वितरीत करण्यात आलेले आहे. पंचायत समिती स्तरावर सगुणा फिड एजंसी यांच्याकडून पशुखाद्य खरेदी करण्यात आलेले आहे. परंतु, याबाबतचे दरकरार केल्याबाबतचे दस्ताऐवज लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही. त्यामुळे निविदा करण्यात आले किंवा कसे, याबाबत खात्री करता आली नाही.

3) आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य यांच्या सन 2015-2016 च्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे खरेदी करावयाच्या पशु खाद्याची गुणवत्ता भारतीय मानक संस्थेचे प्रमाणक क्रमांक - आय एस - 2052-1979-1560-1970 नुसार असणे आवश्यक राहील, असे नमुद आहे. परंतु, पंचायत समिती, भंडाराद्वारे पशुखादय खरेदी करतांना वरीलप्रमाणे गुणवत्ता तपासणी करण्यात आलेले नाही.

4) पशुखाद्य खरेदीची योजना दरवर्षी राबविण्यात येते. परंतु, त्याबाबत मास्टर नोंदवही ठेवण्यात ओलेले नाही. त्यामुळे लाभार्थ्यांना दुबार लाभ देण्यात आले किंवा कसे, याबाबत खात्री करता आली नाही.

### 4.363 कामधेनु दत्तक ग्राम योजनेवर झालेला खर्चाबाबत.

**पंचायत समिती पवनी, जिल्हा भंडारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 33) -** पंचायत समिती पवनी येथील सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणास असे निदर्शनास आले की, पशुसंवर्धन विभागाअंतर्गत कामधेनु दत्तक ग्राम योजना राबविण्यात आलेली आहे व त्यावर रुपये 1,59,677/-खर्च दर्शविण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) नापिकी व कर्जबाजारी शेतकऱ्यांना सावरण्यासाठी शेतीला पशुधनाची जोड मिळावी यासाठी पशुसंवर्धन विभागाने कामधेनु दत्तक ग्राम योजना सुरु केली आहे. जिल्हयातील निवड केलेल्या गावातील पशुधनाची शेतकरीनिहाय नोंदणी, तसेच गत काळात पशुधन कमी होण्याची कारणे व वाढीसाठी उपाय योजना, सध्याचे दुध उत्पादन यात वाढ करण्यासाठी नियोजन याचा गावनिहाय आराखडा तयार करुन ही योजना राबविणे आवश्यक आहे. त्या पध्दतीने कार्यवाही केलेली दिसत नाही.

2) निवड झालेल्या गावात पशुपालकांचे मंडळ गठीत करुन धर्मदाय आयुक्ताकडे त्याची नोंदणी करणे आवश्यक आहे. या पध्दतीने कार्यवाही केलेली नाही.

3) लोकसहभागातुन ही योजना राबविण्यासाठी प्रत्येक गावात वर्षातुन तीन ग्रामसभा घेवुन पशुसंवर्धनाचा वर्षभराचा कार्यक्रम निश्चीत करुन कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे.

4) या योजनेचा लाभ मिळविण्यासाठी गावात किमान 300 दुभती जनावरे असणे गरजेचे आहे.

### 4.364 100 टक्के अनुदानावर बैलजोडी खरेदीतील अनियमिततेबाबत.

**पंचायत समिती देवरी, जिल्हा गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत रक्कम रुपये 48,24,500/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

अभिकरण योजने मधून सन 2015-2016 मध्ये पशुसवर्धन विभागा अंतर्गत पंचवार्षिक योजना अंतर्गत दारिद्रय रेषेच्या उपयोजना (TSP) मधील लाभार्थीयांना 100 टक्के अनुदानावर बैलजोडीचा लाभ देण्याकरीता वरील तपशिलामध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे बैलजोडीवर खर्च रोखपुस्तकाला नोंदविण्यात आला आहे.

1) महाराष्ट्र शासन, कृषि विभाग, शासन निर्णय क्रमांक विघयो-1514/प्र.क्र.97/4अ, दिनांक 07/07/2014 मधील मार्गदर्शक सुचनेमधील क्रमांक 13 नुसार योजनेची प्रसिध्दी व्यापक स्वरूपात करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही केली नाही.

2) महाराष्ट्र शासन, कृषि विभाग, शासन निर्णय क्रमांक विघयो-1514/प्र.क्र.97/4अ, दिनांक 07/07/2014 व शासन निर्णय क्रमांक आउयो- 2414/प्र.क्र.133/4अ, दिनांक 05/06/2014 चे परीशिष्ट दोन नुसार खरेदी करण्यात

आलेल्या प्रमाणक क्रमांक 12, दिनांक 27/08/2015 नुसार 34 बैलजोडीचा विमा उतरविण्यात आला नाही असे लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेल्या अभिलेख्यावरून दिसून येते.

3) लाभार्थी सोबत केलेल्या करारनामावर गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. तसेच करारनाम्यावर दिनांक नमूद नसल्याने करारनामा कोणत्या दिनांकाला केला याचा बोध होत नाही. तसेच बैलजोडी ज्या मवेशी बाजारातून खरेदी करण्यात आली त्या बाजार समितीच्या पावत्यावर बाजार समितीचा शिक्का नाही. तसेच खरेदी पावत्यावरील बीलांचे क्रमांक हे अनुक्रमे लागुन (उदा. 11,12,13,14,15 इत्यादी) आहेत. त्यामुळे पावत्या आपल्या स्तरावर छापल्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच पावती क्रमांक 15, दिनांक 11/05/2015 नुसार श्री. सुरेश भानुदास कोचे यांनी श्री.सचिन चरनदास नंदेश्वर यांच्याकडून बैलजोडी रुपये 29,000/- ला खरेदी केली व ती बैलजोडी नंतर पावती क्रमांक 64, दिनांक 11/05/2015 नुसार श्री.अभिमन ग्यानीराम शहारे यांनी रुपये 29,000/- ला खरेदी केल्याचे लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेल्या अभिलेख्यावरून दिसून येते. त्यामुळे पंचायत समितीने आपल्या स्तरावरून सदर बैलजोडी खरेदी प्रक्रियेची चौकशी करणे आवश्यक आहे.

4) शासन निर्णय अट क्रमांक 5 (II) नुसार सदर योजनेचे मुल्यमापन अहवाल त्रयस्थ यंत्रणेकडून केले नाही व त्यासंबंधी अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

5) महाराष्ट्र शासन, विभाग, शासन निर्णय क्रमांक विघयो-1514/प्र.क्र.97/4अ, दिनांक 07/07/2014 चे परीशिष्ट तीन मधील कलम 8 नुसार विविध सक्षम अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या लाभाची विशिष्ट प्रमाणात तपासणी करणे आवश्यक असताना सन 2015-2016 मध्ये दिलेल्या लाभाबाबत तशी तपासणी करून लाभार्थी योजनेचा वापराबाबत उपयोगिता प्रमाणपत्र पहावयास मिळालेले नाही. त्यामुळे योजनेअंतर्गत केलेल्या खर्चाचा वापर योग्य त्या व्यक्तीकरीता केल्याचे व ती व्यक्ती त्याचा सदुपयोग करीत आहे किंवा त्याने अनुदाना अंतर्गत मिळालेली पशुधन यांची नंतर विक्री तर केली नाही याची खात्री करता येत नाही.

6) उपरोक्त योजना जिल्हा निधी, समाजकल्याण विभागामार्फत सुध्दा राबविण्यात येत असल्याने महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1093/प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 नुसार लाभार्थीचे गावनिहाय मास्टर नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे लाभार्थीना दुबार लाभ दिल्याची पडताळणी करता आली नाही.

7) कृषि उत्पन्न बाजार समितीत बैलजोडी खरेदी करावयाची असतांना संपूर्ण खरेदी समिती हजर राहून सदर खरेदी प्रक्रीयेची कार्यवाही पुस्तिका लिहीणे अनिवार्य आहे. तथापी अशी कार्यवाही करण्यात आल्याचे दिसून येत नाही.

### 4.365 प्रवास भत्ता देयकातील अनियमिततेबाबत.

**पंचायत समिती मुल, जिल्हा चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत रक्कम रुपये 7,625/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती मुलचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षण करीत असतांना काही प्रमाणकांचे प्रवास भत्ता देयके तपासले असता कर्मचाऱ्यांनी कार्यालयात उपस्थित असतांना (कार्यायात उपस्थित असल्याबाबत हजेरीपटावर स्वाक्षरी असतांना देखील) प्रवास केल्याचे दर्शविले आहे. त्यामुळे सदर खर्च अमान्य आहे.

### 4.366 100 टक्के अनुदानावर जनावरांना पशुखादय वाटपाबाबत

**पंचायत समिती भद्रावती, जिल्हा चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 16) -** उपरोक्त बाबीसाठी रक्कम रुपये 2,99,250/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थी निवड अतिरीक्त आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक पशुधन 1/मा.का./4754/2011/पं.स.13, दिनांक 22/07/2011 चे मार्गदर्शक सुचनेनूसार व्यापक प्रसिध्दी देऊन अर्जाची छाननी करुन ग्रामपंचायतीची शिफारस घेऊन पारदर्शक पध्दतीने लाभार्थी निवड होणे आवश्यक असतांना तसे न करता

लाभार्थ्यांकडून मागणी अर्ज घेऊन पशुखादयाचे वाटप केलेले आहे. लाभार्थी निवडीला मंजूरी प्राप्त केल्याचे आढळून आले नाही.

2) पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/ प्र.क्र.323/पदुम-4, दिनांक 11/11/2011 च्या मार्गदर्शक सुचनांमधील अट क्रमांक 3 अन्वये 30 महिला लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात यावे. सदर सुचनेप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळत नाही.

3) पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/ प्र.क्र.414/पदुम-4, दिनांक 06/09/2011 नूसार 3 टक्के विकलांग लाभार्थी घेणे आवश्यक असतांना निवडलेल्या लाभार्थीपैकी एकही विकलांग असल्याबाबतचे दस्ताऐवज नाहीत.

4) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2000/प्र.क्रं.41/33, दिनांक 17/01/2001 मध्ये नमूद केल्यानुसार योजनेचे लाभार्थी निवडीपासुन ते प्रत्यक्ष लाभ देण्यापर्यंतचे वेळापत्रक पाळण्यात आलेले नाही.

सदर योजने संदर्भात लाभ दिलेल्या लाभार्थ्यांकडून उपयोगिता प्रमाणपत्र / फलश्रृती अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झालेला नाही.

**4.367 भाकड / गाभण दुधाळ जनावरांचे पशुखाद्य खरेदीबाबत.**

**पंचायत समिती सावली, जिल्हा चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 1036, दिनांक 29/03/2016 नुसार रक्कम रुपये 2,99,200/- खर्च नोंदविला आहे.

पशुखाद्य खरेदी करिता (1) गोदुध पशुआहार, हिंगणघाट (2) कामधेनु पशु आहार, हिंगणघाट (3) श्रीजी पशुखाद्य इंड्रस्ट्रिज, नागपुर यांचे कडुन निविदा प्राप्त झाल्या असुन त्यामध्ये श्रीजी पशुखाद्य इंड्रस्ट्रिज, नागपुर यांचे दर कमी असल्यामुळे त्यांची निविदा मंजुर करुन त्यांना पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-3/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 मधील 3.2 खरेदीचा प्रकार अंतर्गत 3.2.1 खुली स्पर्धात्मक निविदा मध्ये रुपये 3.00 लक्ष व त्यापेक्षा जास्त असेल त्याबाबत सर्व निविदा हया ई-निविदा पध्दतीत काढण्यात याव्यात असे शासनाचे आदेश असतांना खाजगी स्तरावर दरपत्रके मागवुन निविदा मंजुर करण्यात आली व त्यांना पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

2) अतिरिक्त आयुक्त, पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्रमांक 3827-3900, दिनांक 06/08/2015 अन्वये महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ यांनी माहे जुन-2016 पर्यन्त सन 2014-2015 या वर्षाच्या मंजुर दरानुसार पशुपक्षी खाद्याचा पुरवठा करण्यास तयार असल्याबाबतचे लेखी पत्राद्यारे कळविले आहे. असे असतांना श्रीजी पशुखाद्य इंड्रस्ट्रिज, नागपुर यांची निविदा मंजुर करुन त्यांना पशुखाद्य पुरवठा करण्याबाबतचा आदेश देण्यात आला.

3) अतिरिक्त आयुक्त, पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे यांचे सन 2014-2015 या वर्षाकरिता पशुपक्षी खाद्य दरकरार मधील दरकरारातील अटी व शर्ती मधील अट क्रमांक 2 प्रमाणे भारतीय मानक संस्था (ब्युरो ऑफ इंडियन स्टॅन्डर्ड) निर्देशित प्रमाणक दर्जानुसार पुरवठा करणे पुरवठाधारक संस्थांना बंधनकारक राहिल. परंतु या खरेदीमध्ये पुरवठाचा तपासणी अहवाल संसबधित नस्तीमध्ये उपलब्ध नसुन लेखापरिक्षणास प्राप्त झाला नसल्यामुळे पुरवठा करण्यात आलेले पशुखाद्य हे भारतीय मानक संस्था यांचे निर्देशिल दर्जानुसार आहे किंवा कसे याबाबतची तपासणी करता आली नाही.

4) अट क्रमांक 3 प्रमाणे पुरवठादाराकडुन पुरवठा करण्यात आलेल्या खाद्याची रोग अन्वेषण विभाग, पुणे-07 या संस्थेमधुन सदरचे खाद्य हे Disease Free असल्याबाबतची तपासणी करुन घेण्यात यावी असे नमुद आहे. असे असतांना या प्रकारचा तपासणी अहवाल संबधित नस्तीमध्ये उपलब्ध नसुन लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही.

5) अट क्रमांक 7 प्रमाणे खाद्याचा पुरवठा निर्धारित वेळेत न झाल्यास व संस्थेस खाद्याची निकड असल्यास अशा वेळी स्थानिक बाजारातुन खाद्य खरेदी करावे लागल्यास, मंजुर केलेल्या दरापेक्षा जादा देय रक्कमेची वसुली पुरवठाधारकाकडुन करण्यांत येईल. 15 दिवसाच्या अवधीनंतर विलंबाने खाद्य पुरवठा केल्यास संबधित पुरवठाधारकाकडुन एकुण मागणी किंमतीच्या 0.5 टक्के प्रति आठवडा या प्रमाणे विलंब शुल्क (दंड) आकारण्यात येईल, अशी तरतुद आहे. निविदा मंजुरी नंतर मे. श्रीजी इंड्रस्ट्रिज, नागपुर यांना दिनांक 01/03/2015 ला व महाराष्ट्र कृषि, उद्योग महामंडळ मर्या. यांना दिनांक 08/12/2015 ला पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. अट क्रमांक 7 प्रमाणे 15 दिवसापर्यन्त खाद्याचा पुरवठा करणे आवश्यक आहे. अन्यथा 0.5 टक्के दराने विलंब शुल्काची आकारणी करावयाची आहे. त्या अटी प्रमाणे विलंब शुल्काची रक्कम रुपये 56,848/- (268 दिवस म्हणजे 38 आठवडे x 0.5 टक्के) वसूल करावी.

6) संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, सावली यांनी श्रीजी इंड्रस्ट्रिज, नागपुर (प्रथम पुरवठादार) यांचा पुरवठा आदेश हा दिनांक 06/02/2016 ला रद्द करण्याबाबतचे पत्र दिलेले आहे. त्यापुर्वीच महाराष्ट्र कृषी उद्योग महामंडळ मर्या. यांना दिनांक 08/12/2015 (2 रा पुरवठादार) ला पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

**4.368 50 टक्के अनुदानावर एक दिवसीय सुधारीत कुक्कुट पिलाचे गट वाटप व पशुखाद्य वाटप मधील अनियमितता.**

**पंचायत समिती गडचिरोली, जिल्हा गडचिरोली, सन 2015-16 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत रक्कम रुपये 62,500/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालील अभिप्राय आहेत.

1) खर्च मंजुरी आदेशात नमुद केलेल्या प्राधिकारानुसार पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती, गडचिरोली विकास योजनेच्या खर्चास मंजूरी प्रदान करणेस्तव सक्षम नाही. प्रदान केलेली मंजूरी नियमबाह्य ठरते. संवर्ग विकास अधिकारी किंवा पंचायत समितीची मंजुरी घेतल्याचे आढळून आले नाही.

2) मे. आर एम केमिकल्स नागपूर (50 Kg) 1,700/- प्रति बॅग, मे. शिवम बायोटेक नागपूर (50Kg) 1,650/- प्रति बॅग, मे. श्रीजी पशुखाद्य इन्डस्ट्रिज नागपूर (50 Kg) 1,550/- प्रति बॅगची दरपत्रके नस्तीला लागून आहे. चिक मैश पशुखाद्याचे दरपत्रके बोलावल्याबाबत पंचायत समिती गडचिरोली कडून कोणताही पत्रव्यवहार नसतांना दरपत्रके प्राप्त झाल्याचे दिसून येते. प्राप्त लिफाफे कधी प्राप्त झाले, कधी उघडले, उघडलेल्या दरपत्रकावर सुद्धा तारखा नाही, तुलनात्मक तक्ता नाही, त्यास सं.वि.अ. ची मंजुरी नाही. त्यामुळे वित्तीय नियमाचे पालन न करता पशुखाद्य खरेदी प्रक्रियेची कार्यवाही नियमबाह्य ठरते.

3) राज्य लोकसंख्या धोरणानुसार दोन अपत्यापर्यंतचे मर्यादेत असणाऱ्या लाभाधारकास लाभ देण्याबाबत सुचना आहे. तसे दस्तऐवज प्राप्त केल्याचे नस्तीला आढळून आले नाही.

4) योजनेच्या स्वरुपानुसार 50 टक्के अनुदानावर एक दिवसीय कुक्कुट पिल गट वाटप व कुक्कुट खाद्य (चिकन मैश) लाभार्थ्यांना वाटप करावयाचे असताना लाभार्थ्यांनी 50 टक्के हिस्सा रुपये 8,000/- स्वत: उभारून पिलाच्या गटासाठी निवारा, वाहतुकीकरीता खर्च, उर्वरीत खाद्यावरील खर्च, औषधी, पाण्याची भांडी, खाद्याची भांडी इत्यादीवरील खर्च करावयाचा आहे. परंतु तसे आढळून आले नाही. लाभार्थी हिस्सा 50 टक्के न घेता 100 टक्के अनुदानावर लाभ दिल्याचे दिसून येते. त्यामुळे योजनेच्या स्वरूपाचे विपरीत कार्यवाही केलेली आहे.

5) अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याने योजनेस व्यापक प्रसिध्दी देवून अर्ज मागवून अर्ज स्विकारून जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषदेमार्फत निवड समितीच्या मान्यतेस सादर करणेस्तव शासन निर्णय जिवायो 2010/प्र.क्र.-312/पदुम-4, दिनांक 16/09/2010 नुसार सुचना असताना लाभार्थी निवडीस मान्यता घेतल्याचे आढळून आले नाही. लाभार्थी निवड बाबत पंचायत समिती स्तरावरून प्रस्ताव पाठविल्याचे आढळून आले नाही. त्यामुळे 33 टक्के महिला लाभार्थीचा समावेश आहे किंवा नाही याची खात्री करता आली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2012/प्रक्र-680/ वित्त-9, दिनांक 30/01/2013 नुसार लेखासंहिता 1968 नियम 4 भाग-2 भाग-4 योजनेस प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मंजुरी घेतल्याचे आढळून आले नाही.

7) विनियोजन प्रमाणपत्र प्राप्त केल्याचे आढळून आले नाही.

8) 50 टक्के अनुदानावर एक दिवसीय सुधारीत कुक्कट पिलाचे गट वाटपाचे पंचायत समिती, गडचिरोली करीता 8x2000=16,000/- चे आदेश जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली यांचे पत्र क्रमांक जिपग/पशुस/57, दिनांक 9/3/2016 अन्वये सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, प्रादेशिक अंडी उबवण केंद्र, नागपूर यांना दिले होते. त्याचे बिल क्रमांक 52 दिनांक 29/3/2016 रक्कम रुपये 16,000/- प्राप्त झाले. त्याचे शोधन पंचायत समिती गडचिरोलीने चेक क्रमांक 551802 दिनांक 31/03/2016 अन्वये केलेले आहे. परंतु एक दिवसीय पिलाचे गट प्राप्त झाले नाही. त्याची नोंद साठा पुस्तक पेज क्रमांक 16 वर घेतल्याचे प्रमाणित केले आहे. माल प्राप्त न होता केलेले रक्कम रुपये 16,000/- चे शोधन नियमबाह्य आहे. त्यामुळे सदर रक्कम वसुल पात्र आहे.

9) शासन निर्णय 16/09/2010 योजनेचे मार्गदर्शन तत्वे 11 नुसार लाभार्थ्यांना एक दिवसीय पिलाचे गट पुरविले जातील. त्याचवेळी खाद्य वाटप करण्याची दक्षता घ्यावी असे असताना एक दिवसीय पिलाचे गट प्राप्त झालेले नसताना 8 लाभार्थ्यांना पशुखाद्य (चिक मैश) 30 बॅग 1,550/- प्रति बॅग रक्कम रुपये 46,500/- प्राप्त झालेले आहे. त्याची नोंद साठापुस्तक पेज क्रमांक 14 वर केल्याचे देयकावर प्रमाणित आहे. परंतु अर्धसमासपत्र क्रमांक 02 दिनांक 19/09/2016 व अर्धसमासपत्र क्रमांक 03 दिनांक 27/09/2016 देवून सुद्धा साठा पुस्तक लेखा परिक्षणाला उपलब्ध झाले नाही.

10) लेखासंहिता 1968 नियम 20 व 21 नुसार पुरवठादाराने पोच पावत्या सादर केलेल्या नाहीत.

**4.369 75 टक्के अनुदानावर दुधाळू जनावरे वाटपातील अनियमितता.**

**पंचायत समिती एटापल्ली व मुलचेरा, जिल्हा गडचिरोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13 व 4) -** सदरबाबत पंचायत समिती एटापल्ली व मुलचेरा यांनी अनुक्रमे म्हैसगट वाटप व शेळीगट वाटपाकरिता रक्कम रुपये 80,000/- व 2,55,184/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) योजनेतील वरील लाभार्थ्याचे अर्ज व आवश्यक ते प्रमाणपत्र (लाभार्थ्याचे प्रस्ताव), लाभार्थीने अर्ज सादर केल्याचे दिनांक नमुद नाही, जिल्हा परिषद व पंचायत समितीची मंजुरी दिसुन आले नाही, अनुदान प्राप्त झाल्याबाबत आदेश नमुद केलेले नाही. तसेच दुधाळु जनावरांचा विमा काढलेला नाही, इत्यादी अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध केले नाही. (परिच्छेद क्रमांक 13)

2) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक 1083/1074, दिनांक 09/01/1983 नुसार राबविण्यात येणारी योजना सफल झाल्याबाबत जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली यांनी तपासणी करणे आवश्यक असताना तशी तपासणी केलेली नाही. (परिच्छेद क्रमांक 13)

3) योजनेचे मुल्यमापन व फलश्रुती अहवाल महाराष्ट्र शासन व ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1082/645, दिनांक 29/6/1989 अन्वये राबविलेल्या योजनेचे मुल्यमापन सादर करणेबाबत निर्देश असताना मुल्यमापन व फलश्रुती अहवाल उपलब्ध केलेले नाही. (परिच्छेद क्रमांक 13)

4) पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जीवायो-2011/प्र.क्र305/पदुम-4, दिनांक 22/11/2011 मधील मार्गदर्शक सुचना क्रमांक 13 नुसार दुभत्या जनावरांची खरेदी शक्यतो राज्या बाहेरील नामाकिंत पशुच्या बाजारातुन करण्यात यावी अशी अट असताना त्याप्रमाणे खरेदी प्रक्रिया करण्यात आलेली नाही. (परिच्छेद क्रमांक 4)

5) सदर योजनेतुन पुरवठा केलेल्या दुधाळु जनावराची खरेदी महाराष्ट्र अभियन आयडेन्टीफिकेशन ॲन्ड रेकॉर्डीग ॲथोरीटी यांचेकडे नोंदणी करणे बंधनकारक असताना तशी नोंदणी विभागाने केलेली नाही. (परिच्छेद क्रमांक 4)

6) सदर योजने अंतर्गत वाटप करण्यात आलेल्या जनावरांचे वाटप प्रथमता एका जनावरांचे वाटप करावे व सहा महिन्यानंतर किंवा सदस्य वाटप केलेले दुधाळु जनावर आटल्यानंतर (या मधील जो कालावधी कमी असेल तदनंतर) दुसरे दुधाळु जनावर वाटप करावे अशी अट असताना सुध्दा त्याचे पालन न करता एकाचवेळी दोन दुधाळु जनावर वाटप केल्यामुळे शासन अटीचे उल्लंघन झालेले आहे. (परिच्छेद क्रमांक 4)

7) पशुधन विकास अधिकारी यांनी 25 टक्के प्रत्यक्ष तपासणी व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांनी 10 टक्के प्रत्यक्ष तपासणी केल्याचे आढळुन आलेले नाही. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक 1083/1074 दिनांक 09/01/1983 नुसार राबविण्यात येणारी योजना सफल झाल्याबदल जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद, गडचिरोली यांनी तपासणी करणे आवश्यक असताना तशी तपासणी केल्याचे तसे तपासणी अहवाल लेखापरिक्षणास सादर केले नाही. (परिच्छेद क्रमांक 4)

**4.370 50 टक्के अनुदानावर एक दिवसीय सुधारीत कुक्कुट गट 1 युनिट 100 वाटप योजनेतील अनियमितता.**

**पंचायत समिती भामरागड, जिल्हा गडचिरोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** सदरबाबत रक्कम रुपये 16,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सहाय्यक आयुक्त प्रादेशिक अंडी उबवणी केंद्र, नागपुर यांचे बिल क्रमांक 48, दिनांक 14/03/2016 अन्वये 08 कुक्कुट पक्षी गट 1 युनिट 100 प्रती गट रुपये 16,000/- प्रमाणे भरणा करण्यात आलेले असताना लेखापरीक्षण पुर्ण दिनांक 30/09/2015 पर्यंत 8 कुक्कुट पक्षी गटांचा पुरवठा झालेला नाही. कुक्कुट पक्षी गट प्राप्त होणे पुर्वी खोटे प्रमाणपत्र देऊन सहाय्यक आयुक्त, प्रादेशिक अंडी उबवणी केंद्र नागपुर यांना रक्कम रुपये 16,000/- चे शोधन करणे ही अत्यंत गंभीर अनियमितता आहे.

2) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली यांचे पत्र क्रमांक जीपगड/1415/2015, दिनांक 07/01/2016 प्रमाणे 33 टक्के महिला लाभार्थी निवड करावयाची असताना महिला लाभार्थीची निवड न केल्यामुळे 33 टक्के महिला लाभार्थी लाभापासुन वंचित राहिलेला आहेत.

3) निवड केलेल्या 08 लाभार्थीस लेखापरीक्षण दिनांकापर्यंत लाभ मिळालेला नसल्यामुळे शासन परिपत्रक, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 20000/प्र.क्र 41/33, दिनांक 17/01/2001 मध्ये नमुद केल्यानुसार योजनेचे लाभार्थी निवडीपासुन ते प्रत्यक्ष लाभ देण्यापर्यंत वेळापत्रक पाळण्यात आलेले नाही.

**4.371 विशेष घटक योजने अंतर्गत 75 टक्के अनुदानावर शेळी गट वाटप योजनेतील अनियमितता.**

**पंचायत समिती भोकरदन, जिल्हा जालना, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** पंचायत समिती भोकरदनचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणास पशुसंवर्धन विभागामार्फत विशेष घटक योजनेतुन देयकानुसार एकुण 15 लाभार्थींना पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र येथुन प्रत्येकी 10 शेळी व 1 बोकड अनुदानावर खरेदी करुन वाटप करण्यात आले. याबाबत रक्कम रुपये 7,53,750/- खर्च करण्यात आला आहे. यावर खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात.

1) महाराष्ट्र शासन, कृषि, पुशसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो 2011/प्र.क्र.323/पदुम4, दिनांक 11/11/2011 मधील मार्गदर्शक सुचनेनुसार व्यापक प्रसिध्दी दिल्याबाबत अभिलेखे दिसुन आले नाही.

2) सदरील योजनेकरीता एकुण किती अर्ज प्राप्त झाले व लाभार्थी निवडीकरीता कोणते निकष स्विकारले याबाबत संचिकेत अभिलेखे दिसुन आले नाही.

3) लाभार्थी निवडतांना 30 टक्के महीला व 3 टक्के विधवाना लाभार्थ्यांना लाभ दिलेला नाही.

4) निवड लाभार्थींसाठी शेळी मेंढी पालन प्रशिक्षण आयोजित केल्याचे दिसत नाही.

5) लाभार्थ्यांची यादी संबंधीत ग्रामपंचायत, विशेष समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परीषद यांना त्यांचेकडील लाभ न देणेबाबत पाठविली नाही.

6) वाटप शेळी गटाची पडताळणी केलेबाबत संबंधीत अधिकारी यांचे अहवाल संचिकेत नाही.

7) शेळी गटाची खरेदी दिनांक 14/10/2015, 4 गटाची 23/02/2016 व 1 गटाची 10/03/2016 रोजी करण्यात आली व यांना विमा छत्र अनुक्रमे 30/10/2015,10/03/2016 व 19/03/2016 रोजी म्हणजेच विलंबाने देण्यात आले याबाबत खुलासा करावा.

**4.372 म्हैस वाटपाबाबत.**

**पंचायत समिती परतूर, जिल्हा जालना, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 19) -** सदरबाबत रक्कम रूपये 8,50,620/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/1089/646/43, दिनांक 29/07/1989 अन्वये लाभार्थ्यास अनुदान प्रदान केल्याचा फलश्रुती अहवाल लेखापरिक्षणास सादर करण्यात आला नाही.

2) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रा.वि.वि/1080/सि.आर/67, दिनांक 29/07/1993 नुसार सदर योजनेचा हेतू सफल झालेबाबत उपयोगिता प्रमाणपत्र लेखापरिक्षणास सादर करण्यात आले नाही.

3) ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1089/प्र.क्र.55364, दिनांक 05/10/1989 नुसार लाभार्थी मास्टर रजिस्टर ठेवण्यात आले नाही. त्यामुळे दुबार लाभ दिला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**4.373 शेतकऱ्यांना 50 टक्के अनुदानावर दुधाळ जनावरांचे गट वाटपाबाबत.**

**पंचायत समिती देगलूर, जिल्हा नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती देगलूरने सन 2015-2016 मध्ये पंचायत समिती उपकरातून शेतक-याना 50 टक्के अनुदानावर म्हैस गट खरेदी व वाटपावर प्रमाणक क्रमांक 4, दिनांक 28/03/2016 अन्वये रक्कम रुपये 9,81,600/-प्रदान केलेले आहेत. त्यावर खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येतात.

1) संबंधीत विक्री दाराकडुन 12 लाभार्थीची रक्कम अदा केल्याचे पोचपावत्या प्रती लाभार्थी 80 हजार प्रमाणे एकुण रक्कम रुपये 9,60,000/- चे पोचपावत्या लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे प्रत्यक्ष संबंधीतास रक्कम अदा केल्याची लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

2) लाभार्थ्यानी पंचायत समिती ने दिलेल्या लाभाचा दुर्विनियोग अथवा वस्तुची विक्री करु नये म्हणून त्याचेकडुन रुपये 100/- बंधपत्रावर करार नामा करणे आवश्यक होते. परंतु पंचायत समितीने अशी उचित कार्यवाही केलेली नाही.

3) एकाच लाभार्थीस शासन जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरुन दुबार लाभ मिळाले नसणे बाबतचे पडताळणी करण्यासाठी मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक होते. तथापि पंचायत समिती ने अशी नोंदवही ठेवलेली नाही.

4) योजना अमलबजावणी नंतर लाभार्थ्याकडुन उपयोगिता प्रमाणपत्र तसेच सक्षम प्राधिकारी यांच्या योजनेबाबतचा फलश्रुती अहवाल लेखापरिक्षणात पहावयास मिळाला नाही.

**4.374 कामधेनु दत्तक ग्राम योजने अंतर्गत नाविण्यपुर्ण उपक्रम राबविणे, प्रचार व प्रसिध्दी करणे आणि निकृष्ट चारा सकस करणे याबाबींवर झालेल्या खर्चाबाबतच्या अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती निलंगा, जिल्हा लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 24) -** पशुसंवर्धन विभाग, पंचायत समिती निलंगा यांनी सदरील योजनेवर वित्तिय वर्ष 2015-2016 मध्ये रक्कम रूपये 3,74,428/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 100 व 125 नुसार कोणत्यांही खर्चास प्रथम प्रशासकीय मंजूरी घेणे आवश्यक आहे. त्यानंतर तांत्रिक मंजूरी घेऊन कामांवर खर्च करावयाचा आहे. उक्त मंजूरी आदेश् संचिकेस तपासणीसाठी उपलब्ध झालेले नाहीत. मंजूरी अभावि केलेला खर्च नियमबाहय ठरतो.

2) अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन पुणे यांचे पत्र क्रमांक एफवायपी-11(9) सी आर-585/2012 पसं-6, दिनांक 06/03/2012 च्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे वरील तिन्ही योजना खुद्द स्वत: खात्याने राबविणे आवश्यक असता, आदर्श शेतकरी संघ व शेतीविकास बहुउददेशिय संस्था, बार्डी, ता.पंढरपूर जि.सोलापूर या त्रयस्थ संस्थेला वेगवेगळया 11 गावांकरिता योजना राबविण्यास दिल्या आहेत. त्रयस्थ संस्थेला कोणत्या निकषांधारे व आदेशांन्वये योजना राबविण्यास दिल्या याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

3) त्रयस्थ संस्थेची निवड कोणत्या आधारे केली, संस्थेने आकारलेले दर योग्य व वाजवी होते याचे अभिलेख संचिकेस दिसून आले नाही. त्यांमूळे संस्थेने आकारलेले दर योग्य व वाजवी होते, संस्थेची निवड योग्य होती इत्यादींची खात्री पटवावी.

4) निर्वाचित संस्थेकडून वेगवेगळया बाबींवरच्या खर्चाची प्रमाणके न घेता केवळ लेटर पॅडवरील तपशिलांनुसार देयकाची अदाई केली आहे जि कि नियमबाहय आहे. तरी खर्चाची प्रमाणके घेऊन पूर्तता अहवाल दर्शवावा.

5) विविध कराची रक्कम संबंधीत संस्थेकडून वसूल केलेली नाही. रक्कम वसूल करुन पूर्तता अहवाल सादर करावा.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 29 (4) नुसार रुपये 1,000/- पेक्षा जादा रक्कमचे प्रदान धनादेशादवारे करणे आवश्यक असताना विभागाने अशी कार्यवाही केलेली नाही.

7) योजनेची प्रसिध्दी वेगवेगळया माध्यमाव्दारे केल्याचे दिसून आले नाही.

8) योजनेचा सविस्तर फलश्रुती अहवाल खात्यास सादर केल्याचे दिसून आले नाही. योजनेचा लाभ लाभार्थींना झाल्याची खात्री पटवावी.

**4.375 दुधाळ जनावरे खरेदी योजनेतील अनियमितता.**

**पंचायत समिती चाकूर, जिल्हा लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** पंचायत समिती चाकूर अंतर्गत पशुसंवर्धन विभागाने सन 2015-2016 मध्ये विशेष घटक योजनेतंर्गत अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांना दुधाळ जनावरे म्हशी / संकरित गायी खरेदी साठी 75 टक्के अनुदान व 25 टक्के लाभार्थी हिस्सा अनुक्रमे 63,796/- + 21,265/- याप्रमाणे रक्कम रूपये 3,40,244/- प्रमाणकान्वये खर्च नोंदविला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 अन्वये लाभार्थी निवडीची कार्यवाही पुर्ण करण्यात आली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 50 (4) अन्वये लाभार्थ्याकडून लाभार्थी हिस्सा प्राप्त केल्यानंतर त्यांना नमुना नंबर 10 ची पावती देण्यात आली नाही.

3) लाभार्थ्याच्या लाभार्थी हिस्सा कपातीच्या रक्कमाच्या पावत्या सादर केल्या नाहीत.

4) उपयोगिता प्रमाणपत्रे लेखापरीक्षणात सादर केली नाहीत.

5) महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्सव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक जिवायो-2011/प्र.क्र.305/पदुम-4, दिनांक 22/11/2012 अन्वये 1 ते 33 मार्गदर्शक सुचनांचे पालन केल्याचे दर्शवावे.

6) पशुधन पर्यवेक्षक यांनी जनावरांची वेळोवेळी तपासणी केल्याबाबतचे अहवाल लेखापरीक्षणात पाहावयास मिळाले नाहीत.

7) महाराष्ट्र शासन, कृषि, पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक डीआयएस/10/2001/प्र.क्र.51/पदुम/4, दिनांक 25/02/2002 नुसार नियमित बाजारातून जनावरे खरेदी केल्यानंतर लाळ खुरकूत (FMD) लसीकरण करुन तसे प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे. तशी कार्यवाही केलेली नाही.

8) लाभ घेतल्यानंतर लाभार्थ्याकडे शेळया व म्हशीचे गट आहे किंवा कसे याबाबत अधिकाऱ्यांनी वेळोवळी लाभार्थीकडे भेटी देऊन खात्री केल्याचे अहवाल आढळून आले नाहीत.

9) यापुर्वी लाभ दिलेल्या लाभार्थींची मास्टर नोंदवही ठेवली नाही.

**4.376 कामधेनु दत्तक ग्राम योजने अंतर्गत - नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणे, प्रचार व प्रसिध्दी करणे आणि निकृष्ट चारा सकस करणे या बाबींवर झालेल्या खर्चाबाबतच्या अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती देवणी, जिल्हा लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 14) -** सदरबाबत रक्कम रूपये 1,49,922/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 100 व 125 नुसार कोणत्यांही खर्चास प्रथम प्रशासकीय मंजूरी घेणे आवश्यक आहे. त्यानंतर तांत्रिक मंजूरी घेऊन कामांवर खर्च करावयाचा आहे. उक्त मंजूरी आदेश् संचिकेस तपासणीसाठी उपलब्ध झालेले नाहीत. मंजूरी अभावि केलेला खर्च नियमबाहय ठरतो.

2) अतिरिक्त आयुक्त, पशुसंवर्धन पुणे यांचे पत्र क्रमांक एफवायपी-11(9) सी आर-585/2012 पसं-6, दिनांक 06/03/2012 च्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे वरील तिन्ही योजना खुद्द स्वत: खात्याने राबविणे आवश्यक असता, आदर्श शेतकरी संघ व शेतीविकास बहुउददेशिय संस्था, बार्डी ता पंढरपूर जि सोलापूर या त्रयस्थ संस्थेला वेगवेगळया 06 गावांकरिता योजना राबविण्यास दिल्या आहेत. त्रयस्थ संस्थेला कोणत्या निकषांधारे व आदेशांन्वये योजना राबविण्यास दिल्या याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

3) त्रयस्थ संस्थेची निवड कोणत्या आधारे केली, संस्थेने आकारलेले दर योग्य व वाजवी होते याचे अभिलेख संचिकेस दिसून आले नाही. त्यांमूळे संस्थेने आकारलेले दर योग्य व वाजवी होते, संस्थेची निवड योग्य होती इत्यादींची खात्री पटवावी.

4) निर्वाचित संस्थेकडून वेगवेगळया बाबींवरच्या खर्चाची प्रमाणके न घेता केवळ लेटर पॅडवरील तपशिलांनुसार देयकाची अदाई केली आहे जि कि नियमबाहय आहे. तरी खर्चाची प्रमाणके घेऊन पूर्तता अहवाल दर्शवावा.

5) विविध कराची रक्कम संबंधीत संस्थेकडून वसूल केलेली नाही. रक्कम वसूल करुन पूर्तता अहवाल सादर करावा.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 29 (4) नुसार रुपये 1,000/- पेक्षा जादारक्कमचे प्रदान धनादेशादवारे करणे आवश्यक असताना विभागाने अशी कार्यवाही केलेली नाही.

7) योजनेची प्रसिध्दी वेगवेगळया माध्यमाव्दारे केल्याचे दिसून आले नाही.

8) योजनेचा सविस्तर फलश्रुती अहवाल खात्यास सादर केल्याचे दिसून आले नाही. योजनेचा लाभ लाभार्थींना झाल्याची खात्री पटवावी.